जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर

इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in

मो.क्र.9819208279

**प्रेसनोट** **दिनांक १३.१२.२०२४**

## ''फ्लिप कार्डच्या हबमधुन लाखो रूपये किंमतीचे विविध कपंनीचे मोबाईल फोन,लॅपटॉप चोरी करणाऱ्या ४ आरोपींना अटक ''

गुन्हे शाखा घटक ३ घटकातील पोलीस अधिकारी व अमंलदार यांना त्यांचे गुप्त बातमीदारा मार्फत माहिती मिळाली की, काही इसम चोरीचे मोबाईल फोन, लॅपटॉप तसेच इतर वस्तु विक्री करणेकरिता येणार आहेत. सदर बातमीच्या अनुषंगाने गुन्हे शाखा, घटक-०३ कल्याण येथील पोलीस अधिकारी व अमंलदार यांनी खंबाळपाडा रोड, डोंबिवली पुर्व येथे सापळा लावुन सशंयीत इसम १) प्रणव रविंद्र पांचाळ वय २५ वर्षे रा. मानपाडा डोंबिवली पुर्व २) प्रंशात गंगाराम शेलार वय २५ वर्षे रा. म्हारळ गाव उल्हासनगर ३) अमित भिमराव राणे वय ३० वर्षे रा. तिसगाव, कल्याण पुर्व ४) अजित भिमराव राणे वय २८ वर्षे रा. तिसगाव, कल्याण पुर्व यांना ताब्यात घेतले. त्यांचेकडे वेगवेगळया चार बॉक्स मध्ये मिळुन आलेल्या मोबाईल फोन, लॅपटॉप तसेच इतर वस्तु बाबत विचारपुस केली असता त्यांनी माहिती दिली की, मागील तीन महिन्यात वेळोवेळी चक्की नाका, कोळशेवाडी परिसरातील अमेय हॉस्पीटल समोरील फ्लिप कार्डच्या हबमधुन सदर मोबाईल फोन, लॅपटॉप चोरी केले असल्याचे सांगितले. नमुद संशयीत इसमांच्या ताब्यात मिळुन आलेल्या मोबाईल फोन, लॅपटॉप तसेच इतर वस्तु बाबत परिमंडळ-०३ कल्याण मधील पोलीस ठाणेकडे खात्री केली असता सदरचा गुन्हा कोळशेवाडी पोलीस ठाणे गुन्हा रजि नं. ११३२/२०२४ बी.एन.एस २०२३ चे कलम ३०३(२) प्रमाणे गुन्हा दाखल असल्याची माहिती प्राप्त झाली आहे. सदर आरोपीत यांचेकडुन एकूण ६,३३,६७९/-रुपये किमंतीचे विविध कंपनीचे २३ मोबाईल फोन, २ लॅपटॉप, १ कॅनॉन कपंनीचा कॅमेरा ईलेक्ट्रीक फॅन तसेच विविध कंपनीचे एअर बट्स असा मुद्येमाल हस्तगत करण्यात आला आहे. नमुद आरोपीत यांना गुन्हयाचे पुढील तपासकामी मिळून आलेल्या मुद्देमालासह कोळशेवाडी पोलीस ठाणे कल्याण पुर्व येथे हजर करण्यात आले आहे.

सदरची कामगिरी श्री.अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त, गुन्हे व श्री. शेखर बागडे, सहाय्यक पोलीस आयुक्त, (शोध १) गुन्हे यांच्या मार्गदर्शनाखाली युनिट ३, कल्याण गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. अजित शिंदे, सपोनि/संतोष उगलमुगले, पोउपनि/विनोद पाटील, पोलीस अमंलदार विलास कडु, दिपक महाजन, गुरूनाथ जरग, मिथुन राठोड, विनोद चन्ने, सतिश सोनावणे, यांनी केलेली आहे.

( शैलेश साळवी )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर